सन २०१७-१८ वर्षाकरीता आदिवासी उपयोजनेच्या ५ % निधीचे वितरण ( पेसा ग्रामपंचायतींकरीताचा अबंध निधी )

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र:- **बीयुडी-२०१७ / प्र. क्र. ०१ /का-०६**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, विस्तार इमारत,मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १६ ऑक्टोबर, २०१७.

**वाचा:-**

१) शासन निर्णय, आ.वि.वि. क्रमांकः पेसा-२०१५/प्र.क्र.१९/का-१७ दि.२१.०४.२०१५
२) शासन निर्णय, आ.वि.वि क्रमांकः पेसाअ-२०१५/प्र.क्र.८० /का-१७ दि.२१.०८.२०१५
३) शासन निर्णय, आ.वि.वि क्रमांकः पेसाअ-२०१५/प्र.क्र.९८/का-१७ दि.२१.०८.२०१५
४) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
५) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
६) आ.वि.वि. शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०२ जून , २०१७.

## शासन शुध्दीपत्रक :-

उपरोक्त विषयावरील दिनांक ०२ जून, २०१७ मधील शासन निर्णयामधील " लेखाशिर्ष (२५०१ २९७१) या योजनेसाठी एकुण अर्थसंकल्पीत निधीच्या ८०% प्रमाणात निधी उपलब्ध झाला असल्याने रु. २१४३०.८७ लक्ष इतका निधी नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे." याऐवजी " लेखाशिर्ष (२५०१ २९७१) या योजनेसाठी एकुण अर्थसंकल्पीत निधीच्या ८०% प्रमाणात निधी उपलब्ध झाला असल्याने रु. २१४३०.८७ लक्ष इतका निधी नियंत्रक अधिकारी यांना याद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरचा निधी वाचा क्र.१ येथील शासन निर्णयान्वये शासन स्तरावरुन थेट अनुसूचित क्षेत्रांमधील ग्रामपंचायतींना वर्ग करण्यात येत

असल्याने याकरिता उप सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी व लेखा अधिकारी, रोख शाखा, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील .

तसेच सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या वाचा क्र ४.व क्र ५ .अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची नियंत्रण अधिकारी यांनी खात्री करावी, " असे वाचावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१७१०१२१३५९०८१०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2017.10.16 18:07:28 +05'30'

( रविंद्र दि. औटे )
अवर सचिव, आदिवासी विकास विभाग.

प्रत,

१. सचिव,ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.
४. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद (सर्व)
५. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. कक्ष अधिकारी, कार्यासन-१७, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

.१०निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.